**Indian Streams Research Journal**
Vol-1 Issue-10/November-2011
**ISSN: 2230-7850** Available online www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# वारकरी संप्रदायातील, संत वाङःमय व विद्वानांनी केलेली समीक्षा

अरविंद देशमुख
सहयोगी प्राध्यापक
गो.सी.टोंपे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सांदूरबाजार अमरावती

महाराष्ट्राच्या सर्वांगीण जीवनात संत चळवळीला संत साहित्याला अतिशय महत्वाचे स्थान आहे. सातशे वर्षाची प्रदीर्घ परंपरा असलेल्या संताचे कार्य ाणि त्यांच्या वाङःमयाची समीक्षा अनेक विचारवंतानी ऐतिहासिक, संशोधकीय, पारमार्थिक आणि वाङःमयीन अशा विविध परिप्रेक्ष्यातून केली आहे. अशा संत साहित्याच्या समीक्षकामध्ये डॉ.यु.म.पठाण, गुरुदेव रानडे, डॉ. निर्मलकुमार फडकुले, ग.बा.सरदार आणि डॉ. मुकुंद दातार या मान्यवर लेखकाचा अग्रक्रमाने उल्लेख केला जातो. या मान्यवर लेखकांनी संतसाहित्याची जी समिक्षा केली आहे ती समाज जीवनाच्या वाटचालीमध्ये वारकरी संप्रदायातील संत वाङःमयाचे स्थान कायम आहे, हे निश्चित करणारी आहे.

## संत साहित्य म्हणजे काय ?

संत साहित्य म्हणजे मुख्यतः महाराष्ट्रातील भागवत संप्रदायाच्या संतानी निर्माण केलेले साहित्य होय. तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी ' ज्ञानेश्वरी ' ही गीतेवरील टीका लिहीली. तेथपासून थेट सोळाव्या शतकातील रामदासांच्या दासबोधादि साहित्यापर्यंत, विठ्ठल भक्तिच्या परंपरेत निर्माण झालेल्या संतानी जे साहित्य निर्माण केले. त्या साहित्याला मुख्यत्वे संत साहित्य म्हटले जाते. म्हणजेच तेराव्या शतकापासून म्हणजे ज्ञानेश्वरापासून ते सोळाव्या शतकापर्यंत म्हणजे समर्थ रामदासापर्यंतचा कालखंड हा संत साहित्याने प्रभावित झाला होता असे म्हणता येईल.

केवळ वाङःमयाच्या इतिहाराच्या संदर्भातच नव्हे तर महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाच्या संदर्भातही संत साहित्याचे महत्व मोठे आहे. भाषेच्या दृष्टीने विचार केल्यास संतसाहित्य हे मराठी भाषेच्या प्रारंभ काळातील वैशिष्टयपूर्ण साहित्य आहे. मराठी भाषेत संत साहित्याने उत्तम प्रतीची वाङःमय निर्मिती झाली. अगोदर संस्कृत भाषेतून श्रेष्ठ दर्जाचे साहित्य आणि शात्र निर्माण करणारे अनेक लेखक, कवी, नाटककार आणि विद्वान हे मराठी मातीतून जन्माला आले. भवभूती, राजशेखर, दंडी, भास्कराचार्य हे संस्कृत

साहित्यातले मान्यवर साहित्यकार आणि पंडित मूळचे महाराष्ट्रीयन होते. संस्कृतच्या पाठोपाठ प्राकृत भाषांमधून जे साहित्य निर्माण झले त्यात पुष्पदंत कवीची काव्ये आहेत. आंबेजोगाई येथील ' मुकुंदराज ' हे अकराव्या शतकातले विद्वान कवी मुकुंदराज नाथपंथी होते आणि योगमार्ग सर्वांना सुलभरितीने कळावा म्हणून गुरु शिष्यांच्या संवादाच्या रुपाने त्यांनी ग्रंथ रचना केली.

अकराव्या शतकात होऊन गेलेल्या मुकुंदराज कवीचा ' विवेकसिंधू ' हा काव्यग्रंथ मराठी भाषेतील आद्यग्रंथ मानला जातो. ज्ञानेश्वरीच्या रचनेपूर्वी शंभर वर्षे या ग्रंथांची निर्मिती झली. वेदांतावरील हा मराठीत रचलेला सुलभ ग्रंथ आहे असे म्हटले जाते.

## संत साहित्याचे लेखन

संत साहित्याच्या निर्मितीचा प्रारंभ संत ज्ञानेश्वराने केला. त्यांनी ' ज्ञानेश्वरी ' ही भगवतगीतेवरील टीका लिहून हा प्रारंभ केला. याशिवाय त्यांनी अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, अभंगाची गाथा अशी ग्रंथरचना केली. संत नामदेवांनी सुमारे अडीच हजार अभंग रचले त्यांची हिन्दी भाषेतील 125 पदे उपलब्ध आहेत. त्यापैकी 61 पदे शिखांच्या ' ग्रंथसाहिब ' या पवित्रग्रंथात ' नामदेवजी की मुखबानी ' या नावाखाली समाविष्ट केली आहेत. संत एकनाथ महाराजांनी चतु:श्लोकी भागवत, रुक्मिणीस्वयंवर, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण या ग्रंथाची मराठी भाषेत रचना केली. याशिवाय त्यांनी भारुडे, गौळणी या रचना केल्या. संत तुकारामांनी पाचहजार अभंगाची रचना केली. तर संत रामदासांनी दासबोध हा ग्रंथ लिहीला.

## संत वाङःमय आणि सर्व सामावेशकता

संत साहित्याने सलग आणि प्रभावशाली वाङःमयीन परंपरा निर्माण केली अर्थात केवळ वाङःमय निर्मिती करावी अशी निखळ प्रेरणा नसतांनाही ही वाङःमय रचना झाली. तेराव्या शतकाच्या अखेरीला म्हणजे इ.स. 1290 मध्ये ज्ञानेश्वरीची रचना झाली. त्यापूर्वीची ग्रंथरचना सामान्यतः संस्कृतमध्ये होती. त्यामुळे सर्वसामान्य माणसांपासून हे साहित्य दूर होते. परंतू ज्ञानदेवाची ज्ञानेश्वरी मात्र सर्वांना समजेल अशा सुबोध मराठी भाषेतील, सर्वांसाठी रचलेली, गीता टीका होती. ज्ञानदेवांनी या ग्रंथाद्वारे दाखवून दिले की, संतवाङःमय हे सर्वांसाठी आहे. ज्ञानदेवांनी महाराष्ट्रात भागवत धर्माचा पाया घातला. महानुभव आणि दत्त तसेच नाथ संप्रदायाचे अनुयायी इथे नांदत होतेच. त्यांच्यापेक्षा भागवत संप्रदाय अनेक अर्थानी वेगळा ठरला. पंढरीचा विठ्ठल हे या संप्रदायाचे दैवत । या दैवतामध्ये हरी आणि हर यांचे ऐक्य झाल्याने महाराष्ट्रातील शैव आणि वैष्णव संप्रदाय तेथे एकत्र आले. या संप्रदायापलीकडे जाऊन जातीभेदांतीत असे समतावादी तत्वज्ञान या दैवतांच्या भक्तीमधून संतांनी पुढे आणले. यामुळे भागवत संप्रदाय सर्व समावेश बनला.

## संत साहित्याची विद्वानांनी केलेली समिक्षा

संत साहित्याबाबत गुरुदेव रानडे, डॉ. यु.म.पठाण, डॉ. निर्मलकुमार फडकुले आणि डॉ. मुकुंद दातार यांनी उत्कृष्ट समीक्षापर लिखाण केले आहे.

### श्री गुरुदेव रानडे :

इथे मराठीचिये नगरी, ब्रम्हविद्येचा सुकाळु करी ।। यानुसार ज्ञानदेवादी संतांनी आपल्या वाङःमयातून महाराष्ट्रात ब्रम्हविद्येचा सुकाळ झला. महाराष्ट्रामध्ये निरनिराळया संतांनी आपल्या वाङःमयातून परमार्थाचे रहस्य विशद केले आहे. ज्ञान, भक्ती व कर्म यांचा त्रिवेणी संगम आपल्याला संतवाङःमयात बघावयास मिळतो. ज्ञानेश्वराप्रमाणे ज्ञानी, नामदेवाप्रमाणे भक्तिमान व रामदासांप्रमाणे कर्मयोगी संत महाराष्ट्रात निर्माण झाले... पण याबाबत आपण संतांकडे चमत्कारिक दृष्टीने न पाहता बुध्दिवादी दृष्टीने पाहिले पाहिजे. याबाबत गुरुदेव रानडे म्हणतात, महाराष्ट्र वाङःमयाच्या व महाराष्ट्र धर्माच्या आधारभूत असलेल्या संतवाङःमयाचा अभ्यास आमच्या विश्वविद्यालयातून अवश्य व्हावयास पाहिजे. चमत्कारांच्या दृष्टीने या साधुंच्या चरित्राकडे न पाहता त्यांच्या ग्रंथोक्तीच्या दृष्टीने त्याजकडे पहावयास आपण शिकले पाहिजे व अशारितीने त्याजकडे पाहिले असता बुध्दिवादास पटेल अशाच प्रकारचा अनुभव त्यांच्या ग्रंथात सांगितला आहे असे दिसून येईल.

ज्ञानेश्वरापासून रामदासांपर्यंत जे संत महाराष्ट्रात निर्माण झाले. त्यांनी मराठीमध्ये अत्यंत उज्वल ग्रंथरचना करुन ठेवली आहे. जिचे वाङःमय दृष्टया तसेच परमार्थदृष्टया फारच मोठे महत्व आहे. परमार्थाबद्दलच्या निरनिराळया भ्रामक कल्पनांचे निरसन करुन शुध्द परमार्थाचे स्वरुप समजावून देणे हे संतवाङःमयाचे पवित्र कर्तव्य आहे. याबाबत श्री गुरुदेव रानडे यांनी असे प्रतिपादन केले आहे की, हे कार्य महाराष्ट्रातील संत वाङःमयातून जितक्या उत्कृष्टरीतीने सिध्दीस गेले आहे तितके हिन्दुस्थानच्या इतर प्रांतिक भाषांतून, अगर पाली अगर प्राकृत भाषांतून, अगर शुध्द संस्कृत भाषेतूनही सिध्दीस गेले आहे किंवा नाही याची शंकाच आहे. नुसते परमार्थाचे खरे स्वरुप समजावून देण्याचे सामर्थ्य संतवाङःमयात आहे. इतकेच नव्हे तर सर्व धर्माचे एकीकरण करण्याचे सामर्थ्यही महाराष्ट्र वाङःमयात आहे. धर्मा-धर्मातील लढे केवळ अज्ञानामुळे उत्पन्न होतात पण परमार्थाचे शुध्द स्वरुप कळल्यास ते लढे नाहीसे करण्याचे सामर्थ्य त्यात आहे. असे म्हणण्यास हरकत नाही. यामुळे आमच्या संतसाहित्याचा सशास्त्र अभ्यास होणे किती जरुरीचे आहे हे सांगण्याचे कारण नाही.

### डॉ. यु.म.पठाण :

डॉ. यु.म. पठाण हे संतसाहित्याचे व्यासंगी अभ्यासक आहेत. त्यांनी संम साहित्यावर आधारित संत साहित्य चिंतन हा ग्रंथ लिहीला आहे. त्यांनी संतसाहित्याची समीक्षा करतांना पाश्चिमात्य राष्ट्रांच्या भकासपणाच्या तुलनेत आपला समाज कसा भकास झाला नाही.

याबाबत उत्कृष्ट विवेचन केले आहे. ते म्हणतात की, संतांची दृष्टी व्यापक असल्याने त्यांनी समन्वय नि समावेशतेचे सुत्र मध्ययुगातील वेगवेगळया शतकात सोडले नाही. जे धर्म भारताबाहेरुन आले नि त्यातले जे संत या भूमीशी नि मातीशी एकरुप झाले. त्यांना महाराष्ट्रातील वारकरी, महानुभव, नाथ, नागेश, रामदासी पंथीयांनी आणि वीरशैव धर्मियानी परके मानले नाही तर आपल्यातच सामावून घेतले. शेख महंमद, शहामुनी, अल्लखान, मुंतोजी ब्राम्हणी, सजन कसाई, लतीफ, बाजीर पठाण इत्यादी कितीतरी नांवे या संदर्भात सांगता येतील. परमत साहिष्णूता नि परधर्म सहिष्णूता ही काळाची गरज आहे. या विचाराचा संताना वेगवेगळया काळातही विसर पडलेला नाही . उदात्त जीवनादर्श समाजातून अस्तंगत झाले तर आपले जीवन नि संस्कृतीच उध्वस्त होऊन जाईल. याचे भाग तेराव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या सर्व धर्मांच्या आणि पंथाच्या संतांनी कसं ठेवलं होतं याची साक्ष त्यांनी लिहिलेल्या ग्रंथातून मिळते. आपल्या या उदात्त विचारांचा नि सुसंस्काराचा प्रसार संतांनी कीर्तन- प्रवचनासारख्या विविध माध्यमांतून सातत्याने वेगवेगळया शतकात केला नि जनसामान्यांच्या हृदयातील मानवतेचा नंदादीप विझू दिला नाही , अखंड तेवत ठेवला. तो विझला असता तर पपाश्चात्यांच्या जीवनात जी भकास पोकळी निर्माण झाली आहे ती आपल्याही जीवनात निर्माण झाली असती.

महाराष्ट्रातील संत पुरुषांनी आणखी एक महत्वाचे कालसापेक्ष कार्य केले व ते म्हणजे समाजातील अपप्रवृत्तीवर प्रकाश टाकून त्यांच्यापासून दूर राहण्याचा, तसेच सत्प्रवृत्ती जोपासण्याचा उपदेश केला. आजही संतवाङ:मय वाचतांना आपल्याला उदात्त जीवन मूल्यांचे भाग राहते आणि हे भान इहलोकात तर आपले कल्याण करतेच पण पारलौकीक कल्याणाचीही वाट दाखविते. यातून आपल्याला संतसाहित्याची देशकालातीतता जाणवते. याबाबत डॉ. यु.म.पठाण यांचे प्रतिपादन असे आहे की, संत साहित्य शतकांच्या मर्यादा उल्लंघून पुढच्या शतकात जात होते. त्याचबरोबर त्याला लोकमान्यताही प्राप्त होत होती. हे जसे महाराष्ट्राबाहेरच्या संताविषयी व त्यांच्या साहित्याविषयी म्हणता येईल. संत नामदेव हे पंजाबातही गेले त्यांनी हिन्दी दाक्षिणी हिन्दी भाषेत लेखन केलं नि त्यांचा प्रभाव तेथील जनसामान्यांवर पडला हे खरं पण त्याचबरोबर महानुभव संप्रदायाचे श्री चक्रधर स्वामी नि त्यांनी प्रतिपादलेली सिध्दान्त सुत्रं आणि दृष्टांत, ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी, एकनाथाचा भागवत ग्रंथ नि तुकोबांचे अभंग यांचा महाराष्ट्रात जसा शतकानुशतक प्रभाव पडत गेला तसाच तो महाराष्ट्राबाहेरही पडला. भारतातच नव्हे तर विश्वातल्या अनेक देशात ज्ञानेश्वरीचे नि तुकोबाच्या अभंगाचे अनुवाद कां झाले ? अशाप्रकारच्या प्रश्नांचा शोध घेता घेताच आपल्याला त्यांच्या उत्तरात या संतसाहित्याच्या अक्षरत्वाची कालातीततेची नि शाश्वततेची बीजं गवसतात. रामायण नि महाभारत या सारख्या महाकाव्यात जी बीज आहेत, देशकालाच्या सीमा ओलांडून जाण्याची ऊर्जा, चैतन्य नि सामर्थ्य आहे, त्यांच्याशी संत साहित्यात दडलेल्या या बीजांच कुठं तरी नातं असावं, अनुबंध असावा असं आपल्याला जाणवू लागतं. या साहित्यानं सतत

भव्यत्वाचा, दिव्यत्वाचा, अलौकिकतेचा जो शोध घेतला. त्यांच्याशीही या बीजाचं फार जवळीकीची नातं असावं. याचीही आपल्याला उत्कट नि तीव्र जाणीव होऊ लागते.

मराठी मन आणि संत वाङःमयाचा आढावा घेताना डॉ. यु.म.पठाण पुढे म्हणतात की, " या संतवाणीचा प्रभव मराठी मनावर यास निधी पडला की, हिने मराठी माणसाला लगेच घरदार सोडून रानावनात जाऊन बसायला सांगितले नाही. प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधायला सांगितले. प्रपंचाची कर्तव्य पार पाडून आसूरी संपत्तीचा त्याग कसा करावा. दैवी संपत्ती कशी मिळवावी ते सांगितले, आधी प्रपंच करावा नेटका । " हे सांगून प्रयत्नवादाची कासही धरायला सांगितले. मग हळूहळू विकारावर नियंत्रण प्रस्थापित करुन प्रपंच असा करावी की, जो करिता करिता फिका होत जातो हे ही सांगितले. कसे करावे याची प्रक्रियाच या संतवाणीने उलगडून दाखविली. गृहस्थांनांही धर्मसाधनेत स्थान आहे. त्यांच्याही पारमार्थिक उध्दाराच्या वाटा भक्तीने गवसतात. हा दिलासा या संतवाणीने मराठी मनाला दिला आणि म्हणूनच हे मन भक्तिप्रवण झाले. ज्ञानदेव- तुकारामांच्या, महदाइसा- दामोदर पंडितांच्या, मन्मय स्वामी लक्ष्मण महाराजांच्या अभंगाची पदांची माहिती या मनाला पडली ती यामुळेच ."

डॉ. यु.म. पठाण यांच्या या विवेचनावरुन असं लक्षात येते की, संतसाहित्यामुळे जनसामान्यांच्या हृदयात मानवतेचा नंदादीप सतत तेवीत ठेवला होता. संत साहित्याला केवळ महाराष्ट्रातच नाही तर जगात लोकमान्यता मिळाली आहे. त्याचबरोबर संतांनी वाङःमयातून जनतेला गृहस्थाश्रमातच राहून धर्मसाधना करावी. त्यामुळे पारमार्थिक उध्दाराच्या वाटा गवसतील असा उपदेश संतांनी जनतेला केला होता.

**<u>डॉ. निर्मलकुमार फडकुले :</u>**

डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनाही संतसाहित्याची उत्कृष्ट समीक्षा केली आहे. संतांनी देवाची भक्ती केली हे खरं, पण त्यांचा देव केवळ देवळाच्या मर्यादेत नव्हता. तो माणसात सामावलेला होता. त्यामुळे संतसाहित्यात उदात्त जीवनमूल्ये आहेत आणि म्हणूनच या साहित्याला एक अंगभूत वैचारिक सामर्थ्य आपल्याला जाणवते याबाबत डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, " महाकवी माधान सौंदर्याची व्याख्या करतांना , क्षणे क्षणे यन्मवतामुपैति तदेव रुपं रमणीयताय । प्रतिक्षणी ज्यात नावीन्य आढळते तेच सौंदर्य असे म्हटले आहे. संतांचे वाङःमय काळाच्या अपेक्षेने पाहिले तर ते जुने झाले आहे, पण शतके उलटली तरी ते वाङःमय पूर्वीइतकेच ताजे टवटवीत आहे त्यांचा रंग आणि गंध पूर्वी इतकाच प्रसन्न व मधुर आहे. अनेक नवनवीन वाङःमय प्रकार उदयाला आले. काही अस्तालाही गेले पण अजून ज्ञानेश्वर तुकारामांचा शब्द श्रवणी पडला किंवा वाचनात आला की तो हृदयात आनंदाची कंपने निर्माण करु शकतो. संत हा एक सुंदर चमत्कार आहे. " जीवनात दु:ख आहेत पण हळू हळू

आनंदाने मन भरुन घ्यावे आणि एक दिवस "आनंद भरीन तिन्ही लोक " असा विचार करावा. सारं जग आपलेस करावे असा संदेश संतांच्या वांङःमयातून आपल्याला मिळतो.

**श्री. गं.बा.सरदार:**

श्री. गं. बा. सरदार यांनीही संत साहित्याची उत्तम समीक्षा केली आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील भागवत धर्मीय संतांचे कार्य फार महत्वाचे आहे. म्हणूनच आज सहा-सातशे वर्षानंतरही त्यांच्या वाङःमयाची लोकप्रियता तिळमात्र कमी झालेली नाही. संताच्या चळवळीत धर्मसुधारणेची व लोकजागृतीची भावना होती. वारकरी संतांनी तर स्त्री शुद्रातील जडत्व नाहीसे करुन त्यांच्या जीवनात एक कार्यप्रवर्तक निष्ठा उत्पन्न केली. नुसत्या नामसंकीर्तनाचा प्रचार करुनच हे संत थांबले नाहीत तर आपल्या आचरणाच्या व वाङःमयाद्वारे अंतःशुध्दी, कर्तव्यनिष्ठा, भूतदया, क्षमाशिलता, परोपकार इत्यादी दैवी गुणांची त्यांनी जोपासना केली. त्यांनी कर्मठपणाला विरोध केला पण कर्मप्रवृत्तीला चालना दिली. याबाबत श्री. गं.बा.सरादार म्हणतात की, " वास्तविक पाहता भागत धर्मीय संत मुख्यतः परमार्थाचे उपदेशक असले तरी कर्मप्रवृत्तीला ते अजिबात पारखे झलेले नाहीत. एकनाथांच्या जीवनात व साहित्यात तर अध्यात्माच्या अत्युच्च भूमिकेवरुन व्यावहारिक कर्तव्याचा व सामाजिक सद्‌गुणांचा मुक्त कंठाने गौरव केला गेला आहे. ब्रम्हनिर्वाण हेच मनुष्यमात्राचे अंतिम ध्येय खरे, परंतू त्यासाठी घरदार सोडून अरण्यात जाण्याची कांही गरज नाही. पार्थिव शरीर नश्वर व क्षणभंगूर आहे हे उघड आहे. परंतू त्याचा तिरस्कार करण्यांत शहाणपणा नाही. मनुष्य देहाच्या नश्वरतेबरोबर त्याची श्रेष्ठताही त्यांनी वर्ण केली आहे. आपले शरीर हे भगवत्सेवेचे साधन आहे. भूतदयेचे व परोपकाराचे माहेर आहे. ब्रम्हदशेचे हार आहे. त्यामागच्या वेडगळ कल्पनेने त्याची हेळसांड करण्यांत दर्शीला नाही किंवा भोगलालसेला वश होऊन त्याचे मातेरे करणेही योग्य नाही. अशा तऱ्हेचे विचार सर्वसंतांनी प्रकट केले आहेत."

**डॉ. मुकुंद दातर :**

डॉ. मुकुंद दातार यांनी ' वारकरी संप्रदायाची प्रथानत्रयी ' या ग्रंथात वारकरी संत व वाङःमयाचे योगदान याबाबत समीक्षणात्मक प्रतिपादन केले आहे. ते आपल्या ग्रंथात म्हणतात की, " वारकरी सेंतांनी मध्ययुगीन महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला कर्मकांडाच्या कचाटयातून मुक्त करण्याचा मोठा प्रयत्न केला. तसेच उच्च, उदात्त मूल्यांची निष्ठापूर्वक उपासना सांगितली. श्री ज्ञानदेवांदी सर्व संतांनी अशाच भगवत भक्तीचा, अशाच ' पंथराजा ' चा उपदेश केला आहे की, ज्या ठिकाणी ज्ञान, भक्ती आणि कर्म यांच्या वाटा एकत्र येऊन मिळतात. मध्ययुगीन महाराष्ट्राचे आणि पुढील सर्व काळातही साऱ्या महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि भावनिक जीवन उध्वस्त होऊ नये. यासाठी वारकरी संतांनी मानवता धर्माची शाश्वत जीवनमूल्ये समाज मनात आणि समाज जीवनात प्रयत्नपूर्वक रुजविली. वारकरी संतांनी आणि त्यांच्या साहित्य संपदेने सतत शुध्द लोकधर्म सांगितला सामाजिक जीवनाच्या नैतिक

परिशुध्दीचाही आग्रह धरला. निम्न स्तरांवरील देव-देवतांच्या तामसी उपासनेला प्रतिबंध केला आणि उच्च, उदात्त, परमकारुणिक आणि सर्व संग्राहक अशा एक देवत्वाची कल्पना गौरविली. अशा तऱ्हेने वारकरी संतांनी आणि त्यांच्या साहित्यसंपदेने जनसामान्यातील सुप्त, आत्मिक शक्ती जागविली. सामाजिक सहिष्णूतेची वृत्ती वाढविली. तसेच सर्व जनतेला विश्व कल्याण्याचा आणि मानवताधर्माचा मार्ग श्रध्दापूर्वक दाखविला.

**सारांशः**

वारकरी संप्रदायातील संतांनी जे वाङःमय निर्माण केले. त्याबाबत वरील प्रमाणे श्री. गुरुदेव रानडे, डॉ, यु.म.पठाण, डॉ. निर्मलकुमार फडकुले, श्री. गं.बा. सरदार आणि मुकुंद दातार यांनी उत्कृष्ट समीक्षा केली आहे. ही समीक्षा करतांना या सर्वांनी दाखवून दिले आहे की, संतांनी वाङःमयातून जनतेला दुर्गुणातून बाहेर पडून सदाचारणी बना. धर्माच्या नावाखाली जे कर्मकांड सुरु आहे त्यामध्ये अडकू शका, परमेश्वर एकच आहे. असा उपदेश केला. त्याचबरोबर संतांनी वाङःमयातून कर्मठपणाला विरोध केला पण त्याचबरोबर कर्मप्रवृत्तीला चालना दिली. मानवता धर्माची शाश्वत जीवनमूल्ये समाज मनात आणि समाजजीवनात प्रयत्नपूर्वक रुजविली. संसारात राहून परमेश्वर प्राप्तीचा मार्ग सामान्य जणांना दाखविला. या सर्व अर्थाने संत हे धर्मसुधारक व समाजसुधारक होते असे स्पष्ट होते.

**संदर्भ :**

1) संत, समाज आणि अध्यात्म, वि.शं. चौघुले, मधुरा प्रकाशन, ठाणे
2) महानुभाव व संत वाङःमय, निर्मिती व्यवस्थापक, ग्रंथ निर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
3) अध्यात्म ग्रंथमाला ग्रंथांक 2, संत वचनामृत, श्री. गुरुदेव रानडे, प्रकाशक श्री गुरुदेव रानडे समाधी ट्रस्ट, निंबाळ, जि. विजापूर
4) डॉ. यु.म.पठाण यांचे अध्यक्षीय भाषण, प्रकाशक स्वागताध्यक्ष, चवथे महाराष्ट्र संत साहित्य संमेलन अचलपूर शहर, जि. अमरावती
5) संत साहित्य सौंदर्य आणि सामर्थ्य, डॉ. निर्मलकुमार फडके (मनोगत), स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद
6) संत वाङःमयाची सामाजिक फलश्रुती, गं.बा.सरदार, श्री. विद्या प्रकाशन, पुणे
7) संत साहित्य चिंतन, डॉ. यु.म. पठाण, प्रकाशिका अल्मास पठाण, औरंगाबाद
8) वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी, डॉ. मुकुंद दातार, स्नेहल प्रकाशन, पुणे